—: **प्रेसनोट** :— दिनांक :२३/०८/२०२१

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.नों.क्र. | ३६/२०२१ |
| कलम | ७ भष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालयाचा पत्ताा. | श्री. राजेन्द्र नरसिंगराव राजपूत, वय— ४७ वर्षे, नोकरी— परिवेक्षक नि भांडारपाल, कार्यालयाचा पत्ता — शिक्षण विभाग, मिड डे मेल सेक्शन, पहिला मजला, त्रिवेणी संगम बिल्डीग शाळा, करी रोड (पुर्व), मुंबई —४०० ०१२. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. २४,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. २४,०००/— ( रू.५००/— दराच्या २० भारतीय चलनी नोटा व रू. ५००/— दराच्या २८ खेळण्यातील खोटया नोटा ) |
| थोडक्यात हकिकत | यातील फिर्यादी हे मुंबई महानगरपालीकेमध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचे काम करतात. सन २०१० ते २०२० मार्च पर्यत फिर्यादी यांनी मुंबई महानगरपालीकेमधील शाळांना शालेय पोषण आहार पुरवठा केलेला आहे. सदर कामाची वेगवेगळी बिले मुंबई महानगरपालीकेडे बाकी आहेत. सदर बाबत तक्रारदार हे शिक्षण अधिकारी कार्यालय, महादेव पालव मार्ग, करी रोड मुंबई येथे चौकशीसाठी गेले असता यातील आलोसे नामे राजेन्द्र नरसिंगराव राजपूत यांनी तक्रारदार यांना सांगितले की, “मागील बाकी बीलांपैकी दोन ते तीन लाख रूपये तुमच्या खात्यावर जमा झाले आहेत त्याचे प्रथम १० टक्केप्रमाणे पैसे दया त्यानंतर उर्वरीत बिले काढतो.” परंतु तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि कार्यालयात दिनांक ५/७/२०२१ रोजी तक्रार अर्ज केला.<br><br>फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०८/०७/२०२१, ०९/०७/२०२१, दि.१२/०७/२०२१, दि.१४/०७/२०२१ रोजी पडताळणी केली असता, दरम्यान लोकसेवकाने १० टक्केप्रमाणे रू.२४,०००/— लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने आज दिनांक २३/०८/२०२१ रोजीच्या सापळापुर्व/सापळा आयोजीत केलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री. राजेंन्द्र नरसिंगराव राजपूत यांनी फिर्यादी यांचेकडुन रू.२४,०००/— अशाप्रकारे लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |
| | |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB,
मोबाईलॲप www.acbmaharashtra.net

ACP

( विनोद कालेकर )
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई